व्यंकटेश महाविद्यालयात परिस स्पर्श योजनेअंतर्गत सेमिनार संपन्न

"एनएपी २०२० नुसार संपूर्ण शैक्षणिक क्षेत्र नवे रूप धारण करत असून वर्तनवादाकडून ज्ञानवर्चीतवादाकडे प्रवाह, केवळ सैद्धांतिक अभ्यासक्रमावर भर न देता त्याच्या जोडीस प्रात्यक्षिक आणि आऊट कम बेस्ड शिक्षण पद्धती सध्याच्या नवीन एनईपी धोरणानुसार राबविला जात असून शिक्षक, विद्यार्थी व पालक सर्वांनाच वेगवेगळ्या आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. तसेच नवनवीन संधी देखील या नवीन धोरणामुळे उपलब्ध होत असून शिक्षक म्हणून काम करत असताना आपले माईंड सेट बदलणे गरजेचे आहे. पारंपारिक ऐवजी आधुनिक अध्ययन व अध्यापन साधनांचा वापर करणे आवश्यक बनले आहे, कोविड नंतर संपूर्ण शिक्षण पद्धतीमध्ये अमुलाग्र बदल झाले ऑफलाइन शिक्षण पद्धती ऑनलाइन शिक्षण पद्धतीकडे वाटचाल करू पाहत आहे" असे उद्गार डॉ. व्ही. एस. खंडागळे यांनी श्री वेंकटेश महाविद्यालय इचलकरंजी येथे केले. 'आउटकम बेस्ड टीचिंग, लर्निंग अँड इव्हॅल्युएशन अंडर एनएपी २०२० या विषयावर आधारित परिस-स्पर्श योजनेअंतर्गत श्री वेंकटेश महाविद्यालयाने एक दिवसीय सेमिनारचे आयोजन केले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय माने सेमिनारच्या अध्यक्षस्थानी उपस्थित होते. विद्यापीठाने परिस-स्पर्श योजनेअंतर्गत महाविद्यालयावर इतर महाविद्यालयांना मार्गदर्शन व समुपदेशन करण्यासाठी जबाबदारी सोपविली ती यशस्वीपणे पार पाडण्यासाठी महाविद्यालयाकडून प्रयत्न केले जात आहेत त्याचाच एक भाग म्हणून आज हा सेमिनार आयोजन केला आहे. सध्याचे एज्युकेशन हे आऊट-कम बेस्ड एज्युकेशन असल्याचे देखील मत त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये व्यक्त केले. सेमिनारच्या सुरुवातीस प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. एस. आर. ठाकर, सूत्रसंचालन मोहिनी अंचलिया व आभार डॉ. टी. एच. नाईकवडे यांनी अनुक्रमे केले. सेमिनारसाठी इतर महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग उपस्थित होता.


1 st March, 2025 at 10.30 a.m.
SESSION I
RESOURCE PERSON DR. V. S. KHANDAGALE
TOPIC OUTCOME BASED EDUCATION AND BLOOM'S TAXONOMY
SESSION II
RESOURCE PERSON - Dr. S. H. AMRAWADE
TOPIC - MAPPING OUTCOME AND ATTAINMENT LEVEL
VMI/Podium/2018-19/01
Shri N.B.Education Society's
Shri Venkatesh Mahavidyalaya,